VOL- VI ISSUE-X OCTOBER 2019 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 5.707 ISSN 2349-638x

# भारतीय दारिद्रय: एक चिकित्सक अभ्यास

**प्रा. डॉ. शाहुराज मुळे,**
सहयोगी प्राध्यापक
अर्थशास्त्र विभाग प्रमूख,
कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगांव, ता.जि. लातूर

**प्रस्तावना:—**

भारत हे एक विकसनशील राष्ट्र असून जागतिक क्षेत्रफळाच्या केवळ २.४६ टक्के क्षेत्रफळ भारताच्या वाटयाला आले आहे. तर जागतिक लोकसंख्येच्या १७ टक्के लोकसंख्या भारतात वास्तव्य करत आहे. लोकसंख्येच्या बाबतीत जगामध्ये चीननंतर भारताचा दुसरा क्रमांक लागतो. भारतीय अर्थव्यवस्थेसमोर अनेक समस्या आहेत. त्यापैकी दारिद्रय ही एक प्रमुख समस्या आहे. नियोजन कालखंडात दारिद्रय निर्मुलनासाठी शासनाने अनेक उपाययोजना केल्या असल्या तरी जागतिक लोकसंख्येच्या १/३ भारतीय लोकसंख्या आजही दारिद्रयात जीवन जगताना दिसून येते. नैसर्गिक साधनसंपत्तीने परिपुर्ण अशा भारत देशात दारिद्रय निर्मुलनाच्या उपाययोजना जनतेपर्यंत न पोंहचल्यामुळे इतर विकसित राष्ट्रापेक्षा भारतामध्ये दारिद्रयाचे प्रमाण अधिक असलेले दिसून येते. असे असले तरी आर्थिक विकासाचा दर जर ७ टक्यांच्या पुढे राहीला तर २०२२ पर्यंत भारतातील दारिद्रय खूपच कमी झालेले दिसून येईल. १७ ऑक्टोंबर हा जागतिक दारिद्रय दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी अभिषेक बॅनर्जी यांना दारिद्रयबाबत उत्कृष्ट संशोधनासाठी नोबल पुरस्काराने सन्मानित केले.

**संशोधन पेपरची उदिद्ष्टये:—**

१. लोकसंख्या वाढ आणि दारिद्रय यातील संबंध स्पष्ट करणे.
२. भारतातील दारिद्रय रेषेखालील प्रमाण अभ्यासणे.
३. भारतातील दारिद्रयाच्या कारणांचा अभ्यास करणे.
४. भारतातील दारिद्रय निर्मुलनाच्या उपाययोजनांचा अभ्यास करणे.

**गृहितके:—**

१. भारतात दारिद्रयाचे प्रमाण अधिक आहे.
२. दारिद्रय ही एक सामाजिक समस्या आहे.
३. भारतात दारिद्रय निर्मुलनासाठी अनेक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

**संशोधन पध्दती:—**

प्रस्तूत शोध निबंधाकरिता दुय्यम सााधन सामुग्रीचा आधार घेतलेला असून भारतीय दारिद्रयाच्या संदर्भात विविध संदर्भ ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे, शासनाचे अहवाल व इंटरनेट इत्यादिचा आधार घेतलेला आहे.

**दारिद्रयाची संकल्पना:—**

१)'जीवनमानाच्या किमान गरजा (अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण) पूर्ण करण्याची लोकांची असमर्थता म्हणजेच दारिद्रय होय.' दारिद्रय ही एक सामाजिक समस्या आहे. ज्यामध्ये समाजाचा एक मोठा गट जीवनाच्या मुलभूत गरजापासून वंचित राहतो.

२)मानव विकास अहवाल २००२— 'मानव विकास अहवालानूसार विकसित देशात जे लोक आपल्या मुलांना शिक्षणासाठी शाळेत पाठवू शकत नाहीत. ज्यांच्याकडे स्वत:च्या मालकीचे घर नाही, टि व्ही नाही, कार नाही व इतर चैनीच्या वस्तू नाहीत ते दारिद्रय होय'.

**सापेक्ष दारिद्रय:—**

जेव्हा दोन देश किंवा दोन व्यक्तीमधील, दोन समुहामधील तुलना करावयाची असते तेव्हा सापेक्ष

शब्दाचा प्रयोग केला जातो. देशातील उच्चतम ५ किंवा १० टक्के लोकसंख्येच्या संपत्ती, उत्पन्न किंवा उपभोगाच्या तुलनेत देशातील न्यूनतम ५ किंवा १० टक्के लोकसंख्येच्या संपत्ती, उत्पन्न किंवा उपभोगाचे मोजमाप केल्यास त्यास सापेक्ष दारिद्र्य असे म्हणतात.

**निरपेक्ष दारिद्र्य:—**

भारतातील दारिद्र्याचे निरपेक्ष मोजमाप करण्यासाठी देशातील जीवनमान खर्चाचा विचार करून त्या आधारावर एक न्युनतम उपभोग स्तर निर्धारित केला जातो. या स्तरालाच दारिद्र्यरेषा असे म्हणतात. त्यासाठी NSSO मार्फत दर पाच वर्षानी हाती घेण्यात आलेल्या घरगुती उपभोग खर्चाचा आधार घेतला जातो.

**भारतातील दारिद्र्य मोजमाप पध्दतीची उत्क्रांती:—**

भारतात दारिद्र्य रेषेच्या मोजमापासाठी नियोजन मंडळाने वेळोवेळी कार्य गट स्थापन करून त्यांच्यावर दारिद्र्य रेषा व प्रमाण मोजण्याची जबाबदारी सोपवली.

१) **कार्य गट (१९६२)** — या कार्य गटाने पाच व्यक्तींच्या कुटुंबासाठी राष्ट्रीय किमान उपभोग खर्च रू १०० प्रतिमाह किंवा रू २० प्रति व्यक्ती प्रतिमाह इतका निश्चित केला.

२) **वाय. के. अलग कार्य गट (१९७९)** — या गटाने दारिद्र्य रेषेच्या मोजमापासाठी कॅलरी उपभोग संकल्पनेचा वापर केला. ग्रामीण भागातील जी लोकसंख्या आपल्या दररोजच्या आहारातून २४०० उष्मांक आणि शहरी भागातील जी लोकसंख्या आपल्या दररोजच्या आहारातून २१०० उष्मांक प्राप्त करू शकत नाही. अशा सर्व लोकसंख्येचा दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येत समावेश करण्यात यावा.

३) **एन.सी. सक्सेना समिती** — केंद्र सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने एन सी सक्सेना यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती नेमली. या समितीने सप्टेंबर २००९ मध्ये आपला अहवाल सरकारला सादर केला. याा समितीच्या शिफारशीनूसार पुर्वीची दारिद्र्यरेषा अपुरी असून आवश्यक उष्मांकामध्ये वाढ सुचवली तसेच समितीच्या मते दारिद्र्यरेषे खालील लोकसंख्या ५० टक्के इतकी उच्च आहे. मात्र या सर्व शिफारशी नियोजन मंडळाने फेटाळून लावल्या.

४) **सुरेश तेंडूलकर समिती** — केंद्रीय नियोजन मंडळाने या समितीची स्थापना केली. या समितीने ८ डिसेंबर २००९ साली सरकारला आपला अहवाल सादर केला. समितीने दारिद्र्याचे मोजमाप करण्यासाठी कॅलरीजच्या निकषाचा वापर सोडून देण्याची शिफारस केली. कारण समितीच्या मते कॅलरी उपभोग व पोषण यामध्ये कमी परस्परसंबंध आहे. समितीने दारिद्र्यरेषेचे मोजमाप करण्यासाठी नवीन पध्दती सूचवली ज्यामध्ये आरोग्य व शिक्षणावरील खर्चाचा समावेश करण्यात आला. तसेच शहरी दारिद्र्य रेषेलाच इतर दारिद्र्य रेषेचा आधार मानण्याचीही शिफारस केली. तेंडूलकर समितीच्या अभ्यासानूसार भारतात दारिद्र्याचे प्रमाण २००९—१० मध्ये ग्रामीण,शहरी व देशात हे प्रमाण अनूक्रमे ३३.८,२०.९ व २९.८ टक्के इतके होते. तर २०११—१२ ते अनुक्रमे २५.७, १३.७ व २१.९ टक्के इतके होते.

५) **सी. रंगराजन समिती** — मे २०१२ मध्ये सी रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती नेमली. या समिती मध्ये महेंद्र देव, के सुंदरम, महेश व्यास आणि के दत्ता हे सदस्य होते. या समितीच्या शिफारशीनूसार भारतात दारिद्र्याचे प्रमाण २००९—१० मध्ये ग्रामीण,शहरी व देशात हे प्रमाण अनूक्रमे ३९.६, ३५.१ व ३८.२ टक्के इतके होते. तर २०११—१२ ते अनुक्रमे ३०.९, २६.४ व २९.५ टक्के इतके होते. हे पुढील तक्ता क्रमांक १ मध्ये दर्शवलेले आहे.

जर भारतातील आर्थिक विकासाचा दर ७.३टक्के ते ८.५ टक्के असा सातत्याने राहीला तर २०२० साली हे दारिद्र्याचे प्रमाण १२.४ टक्के इतके कमी होईल.

**तक्ता कं १**
**तेंडूलकर समिती व रंगराजन समितीचा तूलनात्मक अभ्यास**

| | तेंडूलकर समिती | | रंगराजन समिती | |
|---|---|---|---|---|
| | २००९—१० | २०११—१२ | २००९—१० | २०११—१२ |
| ग्रामीण | ३३.८ | २५.७ | ३९.६ | ३०.९ |
| शहरी | २०.९ | १३.७ | ३५.१ | २६.४ |
| भारत | २९.८ | २१.९ | ३८.२ | २९.५ |

***Source :*** Planning Commission, Report of the Expert Group to Review the Methodology for Measurement of Poverty, June 2014.

**लोकसंख्या वाढ आणि दारिद्रय:—**

अर्थव्यवस्थेतील वाढत्या लोकसंख्येत सर्व समस्याचे मुळ असते. वाढत्या लोकसंख्येमुळे दरडोई उत्पन्नात घट होऊन राहणीमानाचा दर्जा घसरतो. परिणामी दारिद्रयाचे प्रमाण वाढत जाते. भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात देखील सरकारने लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवण्यासाठी अनेक उपाययोजना केल्या असल्या तरी १९९१ च्या जनगणनेनुसार ८४.४ कोटी असलेली लोकसंख्या २००१ मध्ये १०२.७ कोटी पर्यंत वाढली. तर हीच लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार १२१ कोटी झाली. परिणामी राष्ट्रीय उत्पन्न वाढून देखील दरडोई उत्पन्नात फारशी सुधारणा होउ शकली नाही व दारिद्रय निर्मुलनासाठी ज्या उपाययोजना सरकारने राबवल्या त्यांना अपेक्षेप्रमाणे यश न मिळाल्यामुळे दारिद्रयाचे प्रमाण ज्या गतीने घटावयास हवे होते त्या गतीने घटले नाही.

**भारतीय दारिद्रयाची कारणे:—**

भारतासारख्या विकसनशील देशात दारिद्रयाची अनेक कारणे आहेत.

१) **अल्प विकास दर—** दारिद्रयाचे पहिले कारण आर्थिक विकासाचा वेग कमी असणे हे आहे. विविध कारणामुळे १९५१—८१ या कालखंडात भारतातील आर्थिक विकासदर सरासरी फक्त ३.५ टक्के होता. १९८१—९१ या कालखंडात हा वृध्दीदर सरासरी ५ टक्के राहीला. १९९१ नंतरच्या काळात वृध्दीदरात सुधारणा होऊन तो ६.८ टक्के राहीला असला तरी लोकसंख्या वाढीच्या वेगाच्या मानाने हा दर खूपच कमी आहे. त्यामुळे भारतात दारिद्रय टिकून आहे.

२) **उत्पन्न विभाजनातील विषमता—** साधन संपत्तीच्या मालकी हक्कामुळे भारतातील राष्ट्रीय उत्पन्नाचे विभाजन खुपच असमान झाले आहे. देशातील १० टक्के श्रीमंत लोकांकडे देशाची ९० टक्के संपत्ती आहे. तर ९० टक्के गरिब वर्गाकडे केवळ १० टक्के संपत्ती आहे त्यामुळे दारिद्रयाचे प्रमाण अधिक असलेले दिसून येते.

३) **लोकसंख्या वाढीचा उच्चदर—** भारतात दारिद्रय अधिक असण्यामागे लोकसंख्या वाढ कारणीभूत आहे. भारतात १९५१—६१ या काळात लोकसंख्येत २१.६४ टक्के, १९७१—८१ मध्ये २४ टक्के, १९८१ ते १९९१ मध्ये २३.५६ टक्केनीं, १९९१—२००१ या काळात २१.६८ टक्के व २००१—२०११ या कालखंडात १९.८ टक्के एवढी लोकसंख्या वाढ झाली लोकसंख्या वाढ अधिक व आर्थिक विकासदर कमी असल्यामुळे दारिद्रय अधिक आहे.

४) **बेरोजगारी—** दारिद्रय आणि बेरोजगारी एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. वाढती लोकसंख्या, आर्थिक विकासाचा मंद वेग व औद्योगिकीकरणाचा अभाव इ. कारणामुळे रोजगार संधी फारशा निर्माण होऊ शकल्या नाहीत परिणामी बेरोजगारी वाढून लोकांचे उत्पन्न वाढले नाही. उत्पन्न कमी झाल्यामुळे जीवनमानाच्या किमान गरजापुर्ण करणे लोकांना अशक्य होऊन दारिद्रय वाढले.

५) **न्युन उत्पादकता—** भारतीय श्रमिक आणि भारतीय शेतीची उत्पादकता विविध कारणामुळे खुपच कमी आहे. कमी उत्पादकतेमुळे उत्पादन खर्चात वाढ होऊन उत्पानद करणे उत्पादकास परवडत नाही. त्यामुळे गुंतवणुकीस अडथळे निर्माण होऊन बेरोजगारीत वाढ घडून येते. बेरोजगारीमुळे उत्पन्नात घट होऊन दारिद्रय टिकून राहते.

६) **प्रादेशीक असमतोल—** भारतामध्ये वर्तमान काळात २९ घटकराज्ये व ७ केंद्रशासित प्रदेश आहेत. सर्व घटकराज्यांचा एकसमान विकास न होता पंजाब, हरियाणा, गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक या राज्यात कृषी व उद्योगधंदयाचा विकास जलद झाला. तर मध्यप्रदेश, ओरिसा, बिहार, आसाम या

राज्याचा शेती व औद्योगिक विकास अल्प आहे. विकसित राज्यपेक्षा मागास राज्यात दरडोई उत्पन्न अल्प राहून दारिद्रय वाढलेले दिसून येते.

**७) दोषपुर्ण विकास व्यूव्हरचना—** नियोजन कालखंडात सरकारने विविध पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून राबवलेल्या विकास व्यूव्हरचनेमुळे रोजगार संधी अपेक्षेप्रमाणे वाढू शकल्या नाहीत. रोजगार संधी न वाढल्यामुळे दारिद्रय टिकून राहिले.

**८) भांडवलाची कमतरता व मागास तंत्रज्ञान—** कोणत्याही राष्ट्राचा विकास हा त्या देशाकडे उपलब्ध असलेल्या भांडवलावर अवलंबून असतो. परंतू भारतामध्ये भांडवलाचा तुटवडा असल्यामुळे शेती व उद्योगधंदयामध्ये आधूनिक तंत्रज्ञाऐवजी मागास तंत्रज्ञान वापरले जाते. त्यामुळे उत्पादन आणि उत्पादकता कमी राहून लोकांचे दरडोई उत्पन्न अल्प राहते परिणामी दारिद्रय टिकून आहे.

**९) सामाजिक कारणे—** आर्थिक कारणाबरोबरच सामाजिक कारणामुळे देखील भारतात दारिद्रय अधिक आहे. सामाजिक व धार्मिक रूढी परंपरामुळे भारतीय लोक दारिद्रयाच्या दुष्टचक्रात अडकलेले आहेत. जन्म आणि मृत्यूचे सामाजिक उत्तरदायित्व, वाढदिवस, लग्नसमारंभ, सण—उत्सव इ. कारणावर लोक अनावश्यक खर्च करतात. खोटी प्रतिष्ठा जोपासण्यासाठी लोक बॅंका आणि सावकाराकडून कर्ज घेतात. जूनी कर्जे फेडण्यासाठी लोक नवीन कर्जे घेऊन कर्जाच्या जाळयात अडकतात. त्यामुळे दारिद्रयात वाढ होते. त्याचबरोबर अज्ञान, निरक्षरता, दैववाद, एकत्र कुटुंबपध्दती इ. मुळे लोक जूने ते सोने या म्हणीवर अडकून पडतात व नावीन्याचा स्विकार करण्यास तयार नसतात म्हणून देखील दारिद्रय टिकून राहते.

**दारिद्रय निर्मुलनासाठी धोरणे व कार्यक्रम:—**

दारिद्रय निर्मुलनासाठी अनेक उपाययोजना स्वातंत्र्योत्तर कालखंडात सरकारने केल्या आहेत. भारताच्या घटनेत तसेच पंचवार्षिक योजनेमध्ये सामाजिक न्याय हे सरकारच्या धोरणाचे प्राथमिक उदिद्ष्ट असल्याचे सांगण्यात आले. बहूतेक सर्व धोणामध्ये दारिद्रय निर्मुलनावर भर देण्यात आलेला आहे व त्या अनुषंगाने सरकारने विविध डावपेचाचा स्विकार करण्यात आला आहे. दारिद्रय निर्मुलनासाठी सरकारने त्री आयामी दृष्टीकोनाचा स्विकार केला आहे.

**अ) वृध्दीआधारित दृष्टीकोन —** हा दृष्टीकान अशा अपेक्षेवर आधारित आहे की, आर्थिक वृध्दीचे परिणाम समाजाच्या सर्व गटापर्यंत पसरले जातील. पहिल्या दुस—या व तिस—या पंचवार्षिक योजनेत वरिल दृष्टीकोनावर अधिक भर देण्यात आला. औद्योगिक आणि कृषी विकासातून दारिद्रय कसे कमी करता येईल यावर भर देण्यात आला. मात्र औद्योगिक व कृषी विकास अपेक्षेप्रमाणे होऊ शकला नाही. हरीत क्रांतीचे फायदे गरिब जनतेपर्यंत पोंहचू शकले नाहीत. त्यामुळे दारिद्रय फारसे कमी होऊ शकले नाही.

**ब) दारिद्रय निर्मुलन कार्यक्रम—** कृषी आधारित दृष्टीकोन अपेक्षेप्रमाणे यशस्वी व ठरल्यामुळे दारिद्रय निर्मुलन करण्यासाठी कार्यक्रमाच्या राबवणुकीवर भर देण्यात आला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती करून दारिद्रयाचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या कार्यक्रमाचे तीन प्रकार पडतात.

१) स्वंयरोजगार कार्यक्रम— उदा: स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना

२) मजूरी रोजगार कार्यक्रम उदा. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना

३) स्वंयरोजगार व मजुरी रोजगार योजनेचे एकत्रीकरण करून स्वर्ण जयंती शहरी रोजगार योजना.

**क) किमान मुलभूत सुविधांची तरतूद—** या दृष्टीकोनात जनतेला किमान मुलभूत सुविधा उपलब्ध करून देऊन दारिद्रयाचा प्रश्न हाताळण्याचा समावेश होतो. सामाजिक उपयोगाच्या गरजावर उदा. अनूदानित दराने अन्नधान्य पुरवठा, शिक्षण व आरोग्य सोयी, पाणीपुरवठा व स्वच्छता इ. वर सार्वजनिक खर्चाच्या माध्यमातून भर देऊन गरीब जनतेचे राहणीमान उंचावण्यावर भर देण्यात आला या बाबतीत भारत जगात अग्रेसर असल्याचे दिसून येते. या दृष्टीकोना अंतर्गत कार्यक्रमाच्या आधारे रोजगार निर्मिती करणे, गरिबाच्या उपभोगात भर घालणे व शिक्षण, आरोग्यात सुधारणा होणे या बाबी अपेक्षित आहेत.

**निष्कर्ष:—**

१)दारिद्र्याचे प्रमाण झपाटयाने कमी करणारे आशिया खंडातील भारत हे एक प्रमुख राष्ट्र आहे. भारतात दर ४४ मिनिटाला दारिद्र्यात घट होत आहे.

२)भारतात दारिद्र्याचे अंदाज व्यक्त करण्यासाठी भिन्न भिन्न पध्दती सूचवण्यात आल्या आहेत. कांही तज्ञांनी प्रतिदीन अन्नापासून मिळणा—या उष्मांकाच्या आधारे दारिद्र्याचे मोजमाप केले तर कांही तज्ञांनी प्रतिमाह दरडोई उपभोग खर्चाचा आधार घेऊन दारिद्र्याचे अंदाज व्यक्त केले.

३)भारतात लोकसंख्या वाढीचा उच्चदर, आर्थिक विकासाचा मंद दर, औद्योगिकीकरणाची अल्प गती इ. कारणामुळे दारिद्र्य हे नियोजन आयोगाच्या अपेक्षेनूसार कमी होऊ शकले नाही.

४)स्वातंत्र्योतर कालखंडात भारतात कल्याणकारी राज्याची संकल्पना स्विकारल्यामुळे सामाजिक न्याय हे उदिद्ष्ट साध्य करण्यासाठी सरकारच्या बहूतेक धोरणामध्ये दारिद्र्य निर्मुलनावर भर देण्यात आला आहे.

५)दारिद्र्याचे प्रमाण कमी करण्यासाठी नियोजन कालखंडात सरकारने स्वंयरोजगाराचे कार्यक्रम हाती घेतले. परंतू वाढत्या लोकसंख्येच्या तूलनेत रोजगार संधी फारशा वाढू शकल्या नाहीत.

**संदर्भ सूची:—**

१. भारतीय अर्थव्यवस्था, प्रा. रायखेलकर/दामजी, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २००३
२. भारतीय अर्थव्यवस्था भाग १, श्री. रंजन कोळंबे, भगीरथ प्रकाशन, पुणे, २०१७
३. भारतीय अर्थव्यवस्था, डॉ. सौ. स्मिता कोंडेवार, अरूणा प्रकाशन,लातूर २०११
४. राष्ट्रीय ग्रामीण विकास आणि पंचायत राज संस्था— ग्रामीण विकास आकडेवारी (nirdpr.org.in)